## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ११ (प्रतिनिधी) : : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांकरीता विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीकरीता 'कवयित्री बहिणाबाई चौधरी फाऊंडेशन कोर्स' हा ऑनलाईन उपक्रम सुरु होत असून या मार्गदर्शन वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा ठरणार आहे. यामध्ये स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत अभ्यासक्रमावर आधारित एकूण ३०० मार्गदर्शन वर्ग ऑनलाईन मोडमध्ये घेतले जाणार आहे. त्यासाठी झूम (Zoom) अॅपचा वापर केला जाईल. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा केंद्राच्या सल्लागार समितीने या पध्दतीचा उपक्रम सुरु करण्याचा निर्णय घेतला व व्यवस्थापन परिषेदेने त्याला यापूर्वीच मंजूरी दिली आहे.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील प्रवेशित किंवा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेवू शकतील. त्यासाठी १०० रूपये प्रवेश फी ऑनलाईन पेमेंट गेटवेच्या माध्यमातून स्वीकारली जाईल. दररोज संध्याकाळी ९० मिनिटांची एक तासिका या पध्दतीने आयोजन करण्यात येणार आहे. प्रारंभीच्या काही तासिका या स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, प्रश्नपत्रिकांचे स्वरूप, पात्रता व निकष यावर आधारित असतील. त्यानंतर अध्ययन कौशल्यावर आधारित तासिका घेतल्या जातील. प्रवेशित विद्यार्थ्यांना ऑनलाईन हजर राहणे आवश्यक असेल. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर लिंक देण्यात आली आहे. सर्व तासिकांचे रेकॉर्डिंग करून विद्यार्थ्यांसाठी युटूब चॅनेलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जाणार आहे. प्रत्येक महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्यकांशी अथवा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (0257-2257411) किंवा संचालक विद्यार्थी विकास विभाग (0257-2257418/419) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक डॉ. अजय सुरवाडे यांनी केले आहे.

### बातमी नं. २

जळगाव दि. ११ (प्रतिनिधी) : युजीसी च्या नियमानुसार उच्च शिक्षणात संशोधन कार्य करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'पीएच.डी. प्रवेश परीक्षा' हा पहिला महत्वपूर्ण टप्पा असून तो पूर्ण केल्याशिवाय विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येत नाही. परंतु आजवर पेपर क्र. १ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अशा मार्गदर्शन कार्यशाळांची नितांत गरज आहे. ज्याद्वारे उच्च शिक्षणातील संशोधक विद्यार्थ्यांचे प्रमाण आपल्याला वाढवता येऊ शकते. असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रो. एस. टी. इंगळे यांनी केले.

## जनसंपर्क विभाग

विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागाद्वारे आयोजित एक दिवसीय 'पीएच.डी. प्रवेश परीक्षा' पेपर १ या मार्गदर्शन कार्यशाळेत मार्गदर्शन प्रसंगी ते बोलत होते. ही कार्यशाळा 'पीएच. डी. प्रवेश परीक्षा' २०२३ परीक्षेत बसलेल्या तसेच नेट व सेट अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त होती. या कार्यशाळेत एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. सदर कार्यशाळेच्या सुरवातीला 'पीएच. डी. प्रवेश परीक्षेचे ' स्वरूप व अभ्यासक्रमाचा परिचय डॉ. संतोष खिराडे यांनी करून दिला. त्यानंतर दिवसभरात चाललेल्या विविध सत्रांद्वारे परीक्षाभिमुख मार्गदर्शन केले गेले. यात संशोधन अभियोग्यता आणि गणितीय आणि तार्किक क्षमता या घटकावर डॉ. मनीषा इंदाणी, अध्यापन अभियोग्यता या घटकावर डॉ. संतोष खिराडे, उच्च शिक्षण प्रणाली या घटकावर डॉ मनीषा जगताप, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान या घटकावर डॉ. समाधान कुंभार आणि पर्यावरणीय जाणीव जागृती या घटकावर डॉ. स्वाती तायडे यांनी मार्गदर्शन केले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ११ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी